**SGN**

**2010**

102158

# मराठी ( अनिवार्य )

**स्तर : उच्च माध्यमिक शालांत परिक्षा** | **एकूण गुण : 200**

**प्रश्नपत्रिकेचे स्वरूप : पारंपरिक** | **कालावधी : 3 तास**

---

***सूचना :***
*(i) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.*
*(ii) प्रश्नासमोरील अंक गुण दर्शवितात.*
*(iii) ज्या क्रमाने उमेदवाराने ऐच्छिक प्रश्न सोडविलेले असतात, त्या क्रमाने अपेक्षित प्रश्न संख्ये इतक्या प्रश्नांची उत्तरे फक्त तपासली जातील व उर्वरित प्रश्नांची उत्तरे तपासली जाणार नाहीत.*
*(iv) तर्कसंगत, संक्षिप्त आणि परिणामकारक लिखाणास यथोचित गुण देण्यात येतील.*
*(v) उत्तरपुस्तिकेच्या आतील भागात कोठेही उमेदवाराने बैठक क्रमांक, स्वत:चे किंवा इतरांचे नाव, पत्ता किंवा आपली ओळख देणारे चिन्ह नमूद करू नये अन्यथा तो शिक्षेस पात्र ठरेल.*

---

**गुण**

1. पुढीलपैकी **कोणत्याही एका** विषयावर सुमारे 500 शब्दांचा निबंध लिहा. **30**
   (अ) नवे शिक्षण नवी बेरोजगारी
   (ब) भेसळ : एक गंभीर समस्या
   (क) सामर्थ्य आहे जाहिरातीचे !
   (ड) आजकालचे चित्रपट
   (इ) वृक्ष संवर्धन : काळाची गरज

2. (अ) पुढील माहितीच्या आधारे सुमारे 100 शब्दांत अर्ज लिहा : **10**
   'छत्रपती सहकारी साखर कारखाना' बारामती, पुणे या कार्यालयात 'शेतकी अधिकारी' या पदासाठी अर्ज करा.

   **किंवा**

   पुढील माहितीच्या आधारे सुमारे 100 शब्दांत मागणीपत्र लिहा :
   'सुरगाणा' या आदिवासी भागात अद्ययावत आरोग्य केंद्राची नितांत गरज असल्याचे मागणीपत्र महाराष्ट्र शासनाला लिहा.

   (ब) पुढील माहितीच्या आधारे सुमारे 100 शब्दांत सभेचा अहवाल लिहा : **10**
   रयत शिक्षण संस्था सातारा कर्मचारी पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. 4.1.2009 रोजी संपन्न झालेल्या सभेचा अहवाल लिहा.

   **किंवा**

   पुढील माहितीच्या आधारे सुमारे 100 शब्दांत वृत्तांतलेखन करा :
   तमाशा फडांचा संगीतबारी कार्यक्रम दि. 15.7.2009 रोजी अकलूज येथे महाराष्ट्र शासनातर्फे संपन्न झाला. त्याचा वृत्तांत लिहा.

गुण

(क) पुढील माहितीच्या आधारे मुलाखतीच्या वेळी झालेला संवाद सुमारे 100 शब्दांत लिहा : **10**
प्रसिद्ध निसर्ग कवी ना.धो. महानोर यांच्या 67 व्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या पळासखेडे गावी प्रसिद्ध कवी फ. मु. शिंदे यांनी घेतलेली मुलाखत संवादरूपाने लिहा.

**किंवा**

पुढील माहितीच्या आधारे पत्रकारपरिषदेचा वृत्तांत प्रश्नोत्तर स्वरूपात 100 शब्दांत लिहा :
दुष्काळी पार्श्वभूमीवर जलसिंचनाची समस्या सोडविण्यासाठी उपोषणाला बसलेल्या अण्णा हजारे यांनी राळेगणसिंधी येथे घेतलेल्या पत्रकार-परिषदेचा वृत्तांत प्रश्नोत्तर स्वरूपात लिहा.

**3.** (अ) मराठी विज्ञान साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी प्रसिद्ध संशोधक व लेखक डॉ. जयंत नारळीकर यांची निवड झाली. महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे-30, पुणे तर्फे त्यांचा दि. 1-10-2010 रोजी सत्कार आयोजित केलेला आहे. या कार्यक्रमाची निमंत्रणपत्रिका तयार करा. **10**

**किंवा**

पुढील माहितीच्या आधारे 'कार्यक्रमपत्रिका' तयार करा :
'मराठा विद्या प्रसारक संस्था' नासिक तर्फे 'कुसुमाग्रजांच्या' वाढदिवसानिमित्त ग्रामीण साहित्य संमेलन शुक्रवार दि. 27.2.2009 रोजी सकाळी 9.00 वाजता के.टी.एच.एम. कॉलेजच्या पटांगणात गंगापूर रोड नासिक इथे संपन्न होत आहे. कार्यक्रम पत्रिका तयार करा.

(ब) पुढील माहितीच्या आधारे 50 शब्दांचे 'शुभेच्छापत्र' तयार करा : **10**
वडिलांच्या अमृतमहोत्सवानिमित्त सोहळा संपन्न होत आहे. श्री रूपेशला शुभेच्छापत्र पाठवायचे आहे. ते तयार करा.

**किंवा**

पुढील माहितीच्या आधारे 50 शब्दांचे 'अभिनंदनपर पत्र' लिहा :
प्रसिद्ध गायक मन्नाडे यांना 2009 सालचा 'दादासाहेब फाळके' पुरस्कार भारत सरकार तर्फे प्राप्त झाला. त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करणारे पत्र लिहा.

(क) पुढील माहितीच्या आधारे प्रसार माध्यमासाठी आवाहनाचा मजकूर सुमारे 100 शब्दांत लिहा : **10**
'पाणी नियोजनासाठी शेतकऱ्यांना आवाहन' - प्रवेशपत्रिका विनामूल्य. महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी कार्यालयात मिळतील. अंतिम तारीख 15.5.2009.

**किंवा**

पुढील माहितीच्या आधारे प्रसार माध्यमासाठी निवेदन सुमारे 100 शब्दांत लिहा :
2009 साली जीवनावश्यक वस्तूंची महागाई गगनाला भिडली आहे. त्याकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी दूरदर्शनसाठी निवेदन तयार करा.

**4.** (अ) खालील दोहोंपैकी **एका** विषयावर औपचारिक भाषणाचा मजकूर सुमारे 100 शब्दांत लिहा : **10**
(i) वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे (ii) कागदी घोडे नाचविणे.

गुण

(ब) खालील दोहोंपैकी **एका** माहितीच्या आधारे दोन व्यक्तीतील संवाद सुमारे 100 शब्दांत लिहा : 10

(i) शेती की नोकरी - कोणती फायदेशीर

(ii) स्वराज्याचे सुराज्य कोण करेल ? - हुकुमशाही की लोकशाही.

(क) खालील दोहोंपैकी **एका** विषयावर झालेल्या गटचर्चेचा संवादात्मक मजकूर सुमारे 100 शब्दांत लिहा : 10

(i) जागतिक मंदीची लाट (ii) पाण्यासाठी दाही दिशा

5. (अ) पुढील दोन इंग्रजी उताऱ्यांपैकी एका उताऱ्याचे सरळ, सोप्या मराठीत भाषांतर करा : 10

**उतारा 1**

However good a constitution may be, it is sure to turn out bad because those who are called to work it happen to be a bad lot. However bad a constitution may be, it may turn out to be good if those who are called to work it, happen to be a good lot. The working of a constitution does not depend wholly upon the nature of the constitution. The constitution can provide only the organs of the state such as the Legislature, the Executive and the Judiciary. The factors on which the working of these organs of the state depend are the people and the political parties they will set up as their instruments to carry out their wishes and their policies.

**उतारा 2**

It would be ungrateful not to recognise how immense are the boons which science has given to mankind. It has brought within the reach of multitudes, benefits and advantages which only a short time ago where the privilege of the few. It has shown how malnutrition, hunger and disease can be overcome. It has not only lengthened life but it has deepened its quality. Fields of knowledge, experience and recreation open in the past only to a few have been thrown open to millions. Through the work of science, the ordinary man today has been given the opportunity of a longer and fuller life than was ever possible for his grandparents. Most thankfully we must acknowledge all that science has done and is doing for the welfare of our race.

(ब) पुढील उताऱ्याचा आशय सरळ, सोप्या भाषेत 100 शब्दांत लिहा : 10

बघता बघता दिवाळी आलीसुद्धा. दरवर्षी दिवाळीच्या आगमनाची तयारी पंधरवडाभर आधीच सुरु होते. रस्त्यारस्त्यांवर दुकानांमध्ये झगमगणारे 'सेल' चे फलक, चमकणारी रोषणाई आणि माणसांनी फुललेले रस्ते, अशा उत्साहात दिवाळीची चाहूल लागते. त्याचबरोबर वाढती महागाई आणि त्यामुळे होणारी पगारदार मध्यमवर्गीय चाकरमान्यांची होणारी मानसिक कुचंबणा, व्यापाऱ्यांची खिसेकापूवृत्ती या साऱ्याचीही चवीने चर्चा करत खरेदी मात्र चालूच असते. अशी वाजतगाजत दरवर्षी दिवाळी येते. कधी दुष्काळ, तर कधी अतिवृष्टी असते. त्याच्या बातम्या वर्तमानपत्रात वाचत आणि टीव्हीवर पाहत आणि कढत उसासे सोडत लोक दिवाळी मात्र साजरी करतात.

गुण

याचे कारण काय? सर्व दैन्य, वेदना, दु:ख दोन दिवसापुरते का होईना विसरून सर्वसामान्य दिवाळीचे असे स्वागत का करतात? याचे एकमेव कारण माणसाच्या ठायी सदैव वास करणारा दुर्दम्य आशावाद. दिवाळीचे आगमन होते, त्यापूर्वी नुकताच पावसाळा संपलेला असतो. शेतामध्ये पिके डोलू लागलेली असतात. कणसे लोंबून धान्य घरातही येऊ लागलेले असते. अशा स्थितीत मने आनंदलेली असल्याने अपेक्षांची पिकेही तशीच डोलू लागलेली असतात. 'दुखभरे दिन बिते रे भैया, अब सुख आवो रे..' असा आशावाद मनाच्या हिंदोळ्यावर झोके घेत असतो. त्याच भावनेने लोक दिवाळीचे स्वागत करत असतात. दिवाळी ही आशांची, अपेक्षांची आणि स्वप्नांचीही जननी बनते. म्हणूनच 'इडापिडा टळो आणि बळीचे राज्य येवो' असे म्हणत घरी लक्ष्मीची पाऊले घेऊन येणाऱ्या दिवाळीचेच दृष्ट काढून औक्षण होते.

अशी दिवाळी! ती येते तेव्हा गर्भवती असते. गरोदर बाईच्या चेहऱ्यावर तेज झळकत असते, असे म्हणतात. तिच्या जड पावलांतही आत्मविश्वास असतो आणि त्यातून निर्माण झालेला डौल! गर्भवतीचे तेज नवनिर्मितीचे असते. एक नवा जीव विश्वात आणण्याचे कर्तृत्व तिच्या अंगी असते. तो आत्माभिमानही महत्वाचा असतो आणि त्या जबाबदारीची जाणिव तिची गती मंद करते. दिवाळीचे तसेच. अनेक आशा, अनेक स्वप्ने पोटात घेऊन दिवाळी येते. हे सारे काही तिच्या पोटात आहे, या जाणिवेनेच लोक आनंदी होतात आणि गर्भवतीला सदैव खूष ठेवण्यासाठी आणि तिचे आरोग्य जपण्यासाठी प्रयत्न करतात. तसेच दिवाळीच्या बाबतीतही घडते. गर्भवती जर आनंदात राहिली तर तिच्या पोटात वाढणारे मूलही सुदृढ होईल, असे वाटत असते. त्या स्वार्थी भावनेनेच आपणही दिवाळीचे स्वागत करतो आणि थाटात तिचे कोडकौतुक पुरवतो. पण ते करतांना तिच्यावर नकळत अपेक्षांचे ओझेही लादतो.

अशी दिवाळी! यंदाही ती गर्भवती आहे. काय असेल तिच्या पोटात? कोणत्या स्वप्नांना ती जन्म देणार आहे? कोणत्या अपेक्षा तिच्या पोटात मूर्त स्वरूप घेत आहेत?

6. (अ) पुढील उतारा वाचून 1/3 शब्दांत सारांशलेखन करा व त्यास योग्य शीर्षक द्या : 10

एकंदर मानव जातीचेच भवितव्य काय असावे? असा प्रश्न केल्यांस मानवजातीची "सर्वांगीण उन्नती" असे थोडक्यात देता येईल म्हणून एकंदर मानवजातीबद्दलचे जे भवितव्य तेच स्त्रीजीवनाचे पण भवितव्य होय. परंतु स्त्रीजातीची सर्वांगीण उन्नती म्हणजे नक्की काय याबद्दल मात्र संपूर्ण एकवाक्यता होतेच असे नाही.

चालू शतक हे दलितोद्धाराचे शतक आहे. आणि स्त्रिया ह्या आजवर दलितवर्गातच मोडत असल्यामुळे त्यांना समानतेच्या भूमिकेवर आणण्यातच ह्या शतकातील सुधारकांची आणि समतावाद्यांची सर्व कर्तबगारी खर्च पडली आहे, व त्याचे फळ म्हणजे केवळ पाश्चिमात्यांतच नव्हे तर भारतातही स्त्रियांसाठी समान हक्क, समान संधी वगैरेंची तरतूद राज्यघटनेतच केली गेली आहे. याचाच अर्थ स्त्रीजीवनाचे भवितव्य ठरविण्याला स्त्रीच आता समर्थ झाली आहे, असा होतो.

मनुष्याला या जगात दोन तऱ्हेची कर्तव्ये पार पाडायची असतात. एक स्वत:बद्दलचे आणि दुसरे इतरांबद्दलचे. आणि ही कर्तव्ये चांगल्या तऱ्हेने पार पाडण्यासाठी त्याला शिक्षण, सामर्थ्य, अधिकार, संपत्ती, योग्य संधी वगैरेंची आवश्यकता असते. तेव्हा या गोष्टी मिळवणे हेच जीवनाचे साध्य नसून मनुष्याच्या कर्तव्यपूर्तीला लागणारी ती साधने आहेत, ही गोष्ट प्रथम लक्षात घ्यावयास हवी.

गुण

साधारणत: प्रत्येक स्त्रीला तिच्या आयुष्यात पुढील भूमिका कराव्या लागतात. कन्या, भगिनी, पत्नी, माता, गृहीणी, गृहस्वामिनी, सुनागरिक इ.

ह्या भूमिका जास्तीत जास्त चांगल्या तऱ्हेने पार पाडता येण्यासाठी स्त्रीला सुदृढ शरीर, बौद्धिक सामर्थ्य आणि सुसंस्कृत आचार विचाराने जोपासले गेलेले कर्तव्यदक्ष असे मन यांची जोड मिळाली पाहिजे. हे ज्या स्त्रीच्या जवळ आहे तिची सर्वांगीण उन्नती झाली आहे, असे म्हणता येईल. आणि अशा उन्नत झालेल्या स्त्रियांनी हेच गुणविशेष आपल्या कुटुंबातील पुढील पिढीत आणि समाजातही सातत्याने रहावेत म्हणून नि:स्वार्थीपणे सतत प्रयत्न करीत रहणे म्हणजेच त्यांना स्वत:ला मिळालेल्या शिक्षणाचे व समानसंधीचे चीज करणे आहे असे मी समजतो.

कुटुंबाने व समाजाने आपल्या उन्नतीसाठी जे प्रयत्न केले, त्यांची परतफेड, त्याच सत्कृतीने प्रत्येकाने केल्यास, समाजातही त्याचे सातत्य रहते, आणि मग तोच मानवाचा स्वभाव बनत जाऊन, समाज हळूहळू आचारविचाराने उन्नत होत जातो, म्हणून कोणत्याही परिस्थितीत आपल्या कर्तव्याला डावलू नये.

थोडक्यात असे म्हणता येईल की आपला गौरव हा पद, प्रतिष्ठा, शिक्षण किंवा पैसा या बाह्यगोष्टीमुळे नाही. माणूस ही काही विकाऊ वस्तू नाही. तर माणूस म्हणून प्रत्येकाला महान मूल्य आहे.

(ब) दिलेला उतारा वाचून त्यावरील प्रश्नांची उत्तरे लिहा : 10

परदेशात जाऊन शिक्षण घेणे, ही शहरी तरुणांची एकेकाळी मक्तेदारी होती. आता शेतकऱ्यांची मुलंही इंग्लंड, अमेरिका, न्यूझीलंड, ऑस्ट्रेलियात जाऊन शिक्षण घेऊ लागली आणि नोकरीही करु लागली आहे. लँडलाईनवरुनच नव्हे तर शेतात काम करतांनाही मोबाईलद्वारे त्यांचे आई-वडील त्यांच्याशी बोलू लागले आहेत. शिक्षणासाठी परदेशांत जाणाऱ्या तरुणांचे वाढते प्रमाण लक्षात घेऊन परदेशातील अनेक शिक्षण संस्था येथील मीडियामध्ये जाहिराती देऊ लागल्या आहेत. आज बहुतांश देशांत भारतीय विद्यार्थी शिक्षण घेतांना किंवा मल्टिनॅशनल कंपन्या, हॉटेल, क्रूझ इत्यादी ठिकाणी नोकरी करतांना दिसत आहेत. भारतीय तरुणांचे हे वाढते प्रमाण लक्षात घेऊन परदेशातील तरुणांना बेकारीच्या भीतीने पछाडले आहे. त्यामुळे ते निराशापोटी आता भारतीय तरुणांवर हल्ले करु लागले आहेत.

भारतातील मध्यमवर्गीयांची वाढती संख्या आणि त्यातील प्रत्येक नागरिक म्हणजे ग्राहक, अशाप्रकारे भारत ही चीनच्या पाठोपाठ एक मोठी दर्जेदार बाजारपेठ आहे. हे लक्षात घेऊन अनेक कंपन्या केवळ भारतात उत्पादन-विक्रीसाठी नाही, तर उत्पादनासाठीही धाव घेत आहेत. परदेशी थेट गुंतवणुकीचे प्रमाण ४० टक्क्यांनी वाढले आहे. ऑगस्टमध्ये भारतात परदेशी अर्थसंस्थांनी ३२७ कोटी डॉलरची गुंतवणूक केली.

हे सर्व लक्षात घेता उपग्रहांपाठोपाठ चांद्रयानही पाठवून अवकाशाला गवसणी घालणारा भारत केवळ इमर्जिंग मार्केट्स म्हणून चीन, ब्राझील आणि रशिया यांच्या पंक्तीला बसणारा देश नाही, तर त्याहीपेक्षा वरचढ आहे, याची कल्पना जगाला आली आहे. म्हणूनच जी-२० देशांच्या नुकत्याच झालेल्या परिषदेत भारताला मानाचे स्थान मिळाले. संयुक्त राष्ट्रांच्या प्रमुख अण्वस्त्रधारी देशांमध्ये भारताचा समावेश व्हायला वेळ लागणार नाही. भारताची सर्वार्थाने समृद्ध आणि संपन्न अशा दिवाळीची पहाट आता फार दूर नाही. प्रत्येक भारतीयांच्या घरासमोर लावलेला भविष्याचा तारा दिवसेंदिवस अधिक तेजस्वी होत जाणार आहे.

गुण

(i) ग्रामीण शेतकरी व त्यांच्या मुलांची कोणती प्रगती झालेली दिसून येते ?

(ii) भारतीय तरुणांवर होणाऱ्या हल्ल्यांची कारणे कोणती ?

(iii) अनेक कंपन्या विक्री व उत्पादनासाठी भारतात येण्याची कारणे सांगा.

(iv) भारताला जी-२० देशांच्या परिषदेत मानाचे स्थान कशामुळे मिळाले ?

(v) लेखकाने भारताचे कोणते भविष्य वर्तविले आहे ?

7. (अ) खालील शब्दांच्या जाती ओळखा. ( **कोणत्याही पाच** ) : 5

(i) विज्ञान

(ii) कोणीकडे

(iii) सूज्ञ

(iv) जडत्व

(v) वणवा

(vi) घड

(vii) पेटीमध्ये

(ब) खालील शब्दांची कंसात दर्शविल्याप्रमाणे शब्दांची रूपे लिहा. ( **कोणतेही पाच** ) : 5

(i) माड (गुणविशेषण करा)

(ii) गारुडी (सामान्य रूप करा)

(iii) खाणे (शक्यतादर्शक क्रियापद करा)

(iv) अर्थ (शब्दयोगी अव्यय करा)

(v) चतुर (भाववाचक नाम करा)

(vi) आश्चर्य (केवल प्रयोगी अव्यये करा)

(vii) खाली (अव्यय साधित विशेषण करा)

(क) खालील वाक्यांचे कंसातील सूचनेप्रमाणे वाक्यात रूपांतर करा. ( **कोणतेही पाच** ) : 10

(i) संजूला भूक लागली तो इतरांच्या आधी जेवला (केवल वाक्य करा)

(ii) मनस्वी आणि कार्यार्थी पुरुष हताश होऊन स्वस्थ बसत नाही. (मिश्र वाक्य करा)

(iii) ढग पळाले, आकाश निरभ्र झाले (संयुक्त वाक्य करा)

(iv) या आधुनिक लोकशाही युगात समाजाने वेळीच जागृत होऊन आपला योग्य मार्ग सुधारावा. (वाक्यप्रकार ओळखा)

(v) आम्हाला नेण्यासाठी जहाज आले. आम्ही बचावलो. (संयुक्त वाक्य करा)

(vi) भगवान विष्णू ध्रुवाला म्हणाले ''मी तुझ्यावर प्रसन्न आहे'' (मिश्रवाक्य करा)

(vii) हिंदुस्थान हा एक देश आहे. या देशात मुख्यत्वे शेतकी चालते. (केवल वाक्य करा)

गुण

(ड) खालील वाक्यांचे काळ ओळखा. ( **कोणतेही पाच** ) : 5

(i) ती जर्मनीला जाणार आहे.

(ii) तुम्ही मते दिलीत तर मी जिंकेन.

(iii) तुकाराम महाराज म्हणतात 'नलगे धनमुक्तिसंपदा! साधुसंग देई सदा'.

(iv) आज काय सांगू ? उद्याचा निर्णय काय तो कळेल.

(v) बाजीप्रभु शर्थीने लढले.

(vi) शिवाजीने तोरणा किल्ला घेतला.

(vii) तू स्वत:चे काम करशील तर मी तुला मदत करीन.

**8.** (अ) खालील वाक्याचे कंसातील सूचनेप्रमाणे रूपांतर करा. ( **कोणतेही पाच** ) : 5

(i) सुरेश गीत गात असे. (रीती भविष्यकाळ करा)

(ii) देव सर्वांचे रक्षण करेन (वर्तमानकाळ करा)

(iii) झाशीची राणी शर्थीने लढत असे. (वर्तमानकाळ करा)

(iv) मी रोज पहाटे उठतो (रीतिवर्तमानकाळ करा)

(v) जाई फळे तोडीत जाईन (भूतकाळ करा)

(vi) चिमणीने घरटे बांधले होते. (वर्तमानकाळ करा)

(vii) सीता खेळत होती. (भविष्यकाळ करा)

(ब) खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा. ( **कोणतेही तीन** ) : 3

(i) छातीचा कोट करणे

(ii) परसातली भाजी

(iii) मारुतीचे शेपूट

(iv) शिर हातावर घेणे

(v) उराशी धरणे

(क) खालील म्हणींचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा. ( **कोणत्याही तीन** ) : 3

(i) काकडीची चोरी फाशीची शिक्षा.

(ii) हलवायाच्या घरावर तुळशीपत्र

(iii) नावडतीचे मीठ अळणी

(iv) जशी कुडी तशी पुडी.

(v) राजा उदार झाला हाती भोपळा दिला.

गुण

(ड) खालील इंग्रजी पारिभाषिक शब्दांना पर्यायी मराठी शब्द लिहा. **( कोणतेही चार )** : 4

(i) Neutral
(ii) Stenographar
(iii) Westerner
(iv) Horoscope
(v) Economical
(vi) Controversial

-oOo-